# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## सामान्य काळातील ३० वा रविवार – २७ ऑक्टोबर २०२४

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः वंधू आणि भगिनीं म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

प्रतिसाद ः प्रभो, आमची प्रार्थना ऐक.

१. आपले पोप फ्रान्सिस, बिशप्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना भाविकांचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी पवित्र आत्म्याचे सामर्थ्य व चांगले आरोग्य मिळावे, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

२. आपल्या सर्व राजकीय नेत्यांनी व अधिका-यांनी स्वतःचा विचार न करता निस्वार्थीपणे व उदारपणे देशाच्या विकासासाठी व गरीब व गरजवंताच्या कल्याणासाठी आपल्या राष्ट्रीय संपत्तीचा सदुपयोग करावा, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

३. आजच्या शुभवर्तमानातील बार्तीमय ह्या आंधळया माणसाला त्याच्या श्रद्धेमुळे दृष्टी प्राप्त झाली. आपण प्रभू येशूला पूर्णपणे ओळखावे, त्याच्यावरील आपली श्रद्धा बळकट व्हावी व त्या श्रद्धेशी आपल्याला नेहमी एकनिष्ठ राहता यावे, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

४. या वर्षभरात विवाहबद्ध होणा-या सर्व वधू-वरांना ख्रिस्ती विवाह साक्रामेंताची शिकवणूक आत्मसाद करण्यासाठी प्रभूची कृपा मिळावी तसेच सर्व प्रथम कम्युनियन मुलांची योग्य ती आध्यात्मिक तयारी व्हावी, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

५. आपल्या गावपरिवारातील सर्वांना विशेष करून जे आजारी आहेत त्यांना चांगले आरोग्य लाभावे, परगावात परदेशात वास्तव करणा-यांवर प्रभूचा आशीर्वाद असावा, आपल्याला चांगले हवामान लाभावे, जगात सर्वत्र शांती नांदावी तसेच सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीपासून आपले रक्षण व्हावे, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक गरजांसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या, तुझ्या लोकांच्या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणा-या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.